१) शालेय शिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक/पिआरई/२००२/३३९५/प्राशि-१/दिनांक २७ फेब्रुवारी २००३
२) सामाजिक न्याय व सांस्कतिक कार्य व विशेष सहाय्य परिपत्रक क्रमांक सीबीसी१०/२००४/प्र.क्र.५७०/मावक-५ दि.५ मार्च २००५
३) ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील दिनांक १६ नोव्हेंबर २००७ चा शासन निर्णय
४) मा.झं.सा.रणदिवे अवर सचिव महाराष्ट्र शासन यांचे कडील शिसेयो १८०९/प्र.क्र.६२/प्राशि-१/शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई दिनांक ०३ जून २००९
५) मा.झ.सा.रणदिवे अवर सचिव महाराष्ट्र शासन यांचे कडील पत्र क्रमांक पीआरई/२००८/(प्र.क्र.२७५)प्राशि-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई २० नोव्हेंबर २००९
६) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.पीआरई-२००६/(४७६७)/प्राशि-१/दि.१६ डिसेंबर २००९
७) मा. शिक्षण संचालक यांचेकडील पत्र क्रमांक प्राशिसं/२०१६-१७/डी.एड्.सीईटी/पूर्न.शिपाउमे.प्र.नि./ड-५०२/५४०६ दि.१७ नोव्हें.२०१६.
८) या कार्यालयाकडील जिल्हा निवड समिती कडील दि. १५/१२/२०१६ रोजीची निवडपात्र शिफारस केलेली यादी.
९) या कार्यालयाकडिल मंजूर टिपणी दिनांक :- १५/१२/२०१६

---

जा.क्र.प्राथ/आस्था-२/शिक्षणसेवक भरती/वशी- /२०१६
प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सांगली
दिनांक :- १५/१२/२०१६

# आदेश

उपरोक्त संदर्भ क्रमांक ३ मधील शासन निर्णयानुसार शिक्षण सेवक म्हणून त्याचे नावासमोर दर्शविलेल्या शाळा व तालुक्यामध्ये उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे् दाखल असलेली याचिका क्रमांक ३३८१/२००० व रिट याचिका ११८७/२०१५ मधिल अंतिम निर्णयाच्या अधिन राहून तसेच मा. शिक्षण शिक्षण संचालक पुणे यांचेकडील डी.एड.सी.ई.टी. २०१० मधील पुर्नपडताळणीमध्ये शिफारस पात्र ठरलेल्या प्राप्त उमेदवारांच्या यादीमधील जिल्हा निवड समितीच्या पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांना खालील अटींच्या अधिन राहून शिक्षण सेवक नियुक्ती देण्यात येत आहे . **सदर नियुक्ती दिलेल्या उमेदवारांनी नियुक्ती आदेश मिळालेपासून ७ दिवसाचे आत नियुक्ती दिलेल्या पंचायत समितीकडे हजर होणेचे आहे.**

| अक्र. | उमेदवाराचे नाव | लिंग | नियुक्ती प्रवर्ग | माध्यम | समांतर आरक्षण | मानधन | नियुक्ती शाळा व तालुका |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **श्रीमती सय्यद निलोफर ईस्माईल,** मु.पाडळी केसे, पो.सुपने, ता.कराड, जि.सातारा | स्त्री | खुला | मराठी | महिला | ६००० | जि.प.शाळा, **नेलकरंजी,** ता.आटपाडी |
| २ | **श्री. शिकारे गणेश मोहन,** मु.पो.यशवंतनगर स्वरुपनगर,अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर | पुरुष | खुला | मराठी | --- | ६००० | जि.प.शाळा, **बिळूर,** ता.जत |
| ३ | **कुमारी निकम स्फूर्ती महादेव,** मु.पो.माहुली, ता.खानापूर, जि.सांगली | स्त्री | खुला | मराठी | महिला | ६००० | जि.प.शाळा, **दु.गा.मळा** , ता.तासगांव |
| ४ | **श्रीमती पाटील माया शिवाजी,** मु.पो.निजामवाडी भेडसगांव, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर | स्त्री | खुला | मराठी | महिला | ६००० | जि.प.शाळा, **खानापूर,** ता.खानापूर |
| ५ | **श्री. पवार अभिजीत राजेंद्र,** मु.पो.लासुर्णे, ता.इंदापूर, जि.पुणे | स्त्री | खुला | मराठी | --- | ६००० | जि.प.शाळा, **कंठी,** ता.जत |
| ६ | **श्री. चौधरी शशिकांत आप्पा,** मु.पो.कविटगांव, ता.करमाळा, जि.सोलापूर | पुरुष | खुला | मराठी | --- | ६००० | जि.प.शाळा, **जत नं.३,** ता.जत |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | **श्री. गायकवाड लक्ष्मण चांगदेव** मु.पो.शेळगांव आर, ता.बार्शी, जि.सोलापूर | पुरुष | खुला | मराठी | --- | ६००० | जि.प.शाळा, **बिराजदारवस्ती (जालिहाळ बु.)** ता.जत |
| ८ | **श्रीमती कसबे शितल हरी,** मु.भेगांव, पो.कारंबा, ता.उ.सोलापूर, जि.सोलापूर | स्त्री | अनु. जाती | मराठी | महिला | ६००० | जि.प.शाळा, **व्हसपेठ,** ता.जत |
| ९ | **श्री. फाळके अंकुश शहाजी,** मु.हळदहिवडी, पो.धायटी, ता.सांगोला, जि.सोलापूर. | पुरुष | अनु. जाती | इंग्रजी | --- | ६००० | जि.प.शाळा, **शेडयाळ,** ता.जत |
| १० | **श्रीमती काळे सोनाली कल्याण** मु.पो. उंडवडी क.प.,ता.बारामती जि. पुणे | स्त्री | खुला | इंग्रजी | --- | ६००० | जि.प.शाळा, **घरनिकी,** ता.आटपाडी |

**नेमणूकीच्या अटी व शर्ती**

१) नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरूपाचे गैरवर्तणूक केल्यास आपली नियुक्ती रदद करण्यात येईल.

२) नियमीत स्वरूपांत नियुक्ती केलेल्या प्राथमिक शिक्षकाच्या किंवा शासकीय कर्मचा-यांच्या सेवा-सुविधा आपणांस शिक्षण सेवक कालावधीमध्ये देय होणार नाहीत .

३) शिक्षण सेवक पदावर तीन वर्षे समाधानकारक सेवा पूर्ण केल्यानंतर आपणास शिक्षकांच्या नियमित वेतनश्रेणी मध्ये नियुक्ती देण्यास पात्र समजणेत येईल. आपण शिक्षण सेवक म्हणून केलेली सेवा सेवानिवृत्तीवेतन व सेवानिवत्तीनंतरचे देय फायदे यासाठी (महाराष्ट्र शासन वित्त विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडिल सुधारीत शासन निर्णय क्रमांक अनयो १००५/१२६/सेवा-४,दि.३१ आक्टों.२००५ अन्वये )ग्राहय धरली जाईल

४) शिक्षणसेवकाच्या पदाचा कालावधी तीन वर्षे इतका राहील . प्रशिक्षित शिक्षण सेवकास दरमहा ६०००/- रूपये व अप्रशिक्षित शिक्षण सेवकास ३०००/- रूपये याप्रमाणे मानधन अनुज्ञेय राहील. तसेच शिक्षण सेवकांना दीर्घ सुटटीसह पूर्ण शैक्षणिक वर्षातील १२ महीन्याचे मानधन अनुज्ञेय राहील .

५) अप्रशिक्षित उमेदवारांनी नियुक्ती दिल्यानंतर तीन वर्षाच्या कालावधीत स्वखर्चाने पत्राव्दारे प्रशिक्षण कार्यक्रमामार्फत विहित व्यावसायिक अर्हता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील. याबाबत आवश्यक पत्रव्यवहार करुन ३ वर्षात संबंधित उमेदवारांनी पत्राव्दारे योजनेअंतर्गत विहित अर्हता (डी.एड) प्राप्त करुन घेणेची यथोचीत कार्यवाही गटशिक्षणाधिकारी यांचेवर राहील. जर तीन वर्षात डी.एड.ही अर्हता न झालेस त्याची सेवा समाप्त करणेत येईल. याबाबतचा प्रस्ताव गटशिक्षणाधिकारी यांनी या कार्यालयास सादर करणेची दक्षता घ्यावी. याबाबतची जरुर ती नोंद सेवापुस्ताकांत घेणेची आहे. आपणास शिक्षण सेवक म्हणून हमीपत्रातून मुक्त व्हावयाचे असल्यास आपण आपल्या शाळा प्रमुखांमार्फत किमान एक महिन्याची पूर्व सूचना आपल्या नियुक्ती प्राधिका-यांस देणे बंधनकारक राहील. अन्यथा एक महिन्याचे मानधन शासन लेखाशिर्षकाखाली जमा करावे लागेल.

६) नियुक्तीच्या कालावधीत आपणास खालील कर्तव्ये पार पाडावी लागतील.

अ) संबंधित गावातील शाळेत जाण्यायोग्य वयाच्या सर्व मुलांना शाळेमध्ये दाखल करुन घेण्याच्या तसेच विदयार्थ्यांची शाळेतील उपस्थिती टिकविण्यांच्या दृष्टीने पालकांशी संपर्क ठेवणे

ब) शाळेमध्ये दररोज संपूर्ण शालेय कालावधीमध्ये नियमित व वेळेवर उपस्थित राहणे

क) अभ्यासक्रमांमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ते शैक्षणिक साहित्य निर्माण करणे

ड) नेमणूक दिलेल्या वर्गाचे विहित कार्यपध्दतीनुसार अध्यापन करणे.

ई) शासनाने आवश्यक केलेल्या प्रशिक्षणांस उपस्थित राहणे

फ) शाळेचे मुख्याध्यापक केंद्र प्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या नियंत्रणाखालील काम करणे व शैक्षणिक बाबीबाबत त्यांच्या आदेशाचे पालन करणे

ग) वर्गातील विदयार्थ्यांचे सातत्यपूर्ण व सर्वकष मूल्यमापन करणे

ह) शैक्षणिक व इतर उपक्रमांच्या आयोजनामध्ये सहभागी होणे.

७) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील दि.२९ जानेवारी १९९९ अधिसूचनेनुसार व सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रशिक्षण – २०००/प्र.क्र.५/२००१/३८ दि. २० जुलै २००२ मधील प्र. क्रं. ३ मधील (३) अन्वये वरील पैकी ज्या कर्मचाऱ्यांचे वय सदर आदेशाच्या दिनांकास ५० वर्षे पूर्ण पेक्षा कमी आहे अशा कर्मचाऱ्यांना संगणक एम.एस.सी.आय.टी. परिक्षा हजर दिनांकापासून दोन वर्षाच्या आत पास होणे आवश्यक आहे.

८) शासन परिपत्रक क्र. एसपीई/२०००(१३२/२०००)साशि-१ दि. २ जून २००० नुसार उमेदवारांच्या डी.एड. गुणपत्रक व प्रमाणपत्रांची मा.संचालक महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांचेकडून पडताळणी करुन घेतली जातील. सदरची नियुक्ती ही डी.एड. प्रमाणपत्र व गुणपत्रक यांच्या वैधतेवर अवलंबून राहिल डी.एड. गुणपत्रक व प्रमाणपत्र अवैध ठरल्यास सेवेतून कमी केले जाईल व त्यांचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल .

९) उमेदवार रुजू झालेच्या तारखेपासून दोन महिन्याच्या आत नजिकच्या जिल्हा परिषद आरोग्य केंद्राकडून वैदयकिय अधिका-याचे जिल्हा परिषद सेवेत नेमणुकीस शारिरीकदृष्टया पात्र असलेबाबतचे प्रमाणपत्र स्वखर्चाने हजर करावे जिल्हा परिषद सेवेत शारिरीकदृष्टया अपात्र ठरलेस त्यांना सेवेतून तात्काळ कमी करण्यात येईल.

१०) उमेदवार हजर होताच त्यांचेकडून भारत सरकार व भारतीय घटना या विषयी एकनिष्ठ राहील अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र नमुन्यात भरुन घेवून ते त्यांचे सेवापुस्तकात जोडणेचे आहे.

११) महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम २० नुसार ज्यांची पत्नी/ पती हयात आहेत अशा जिल्हा परिषद कर्मचा-यास दुसरा विवाह करता येणार नाही.

१२) उमेदवारांची नेमणुक पोलीस खात्यांमार्फत उमेदवारांच्या पूर्वचारित्र्य व चारित्र्याबाबतचा दाखला येणेच्या अटीवर केली आहे. सदरबाबत पोलीस खात्याकडून प्रतिकुल शेरा आल्यास त्यांना नोकरीतून कमी करण्यात येईल. याबाबत गटशिक्षणाधिकारी यांनी पोलीस खात्याकडे पत्र व्यवहार करुन अहवाल प्राप्त करुन घेणेचा आहे. प्रतिकुल शेरा आल्यास पुढील कार्यवाहीसाठी जिल्हा परिषदेकडे तात्काळ प्रस्ताव पाठविणेचा आहे.

१३) प्रस्तुत उमेदवार नोकरीत रुजू झालेनंतर त्यांना प्रथम मानधन आदा करताना, प्रस्तुत उमेदवाराची नेमणुक नियमानुसार व्यावसायीक शैक्षणिक पात्रतेनुसार लायक असलेबाबत जरुर तो दाखला प्रथम पगार पत्रकात न चुकता दाखल करणेचा आहे.

१४) नियुक्तीचे कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरुपाचे गैरवर्तणुक केल्यास आपली नियुक्ती रद्द करणेत येईल.

१५) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००)/१२दिनांक १/६/२००६ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवेतील गट अ ते ड मधील सर्व पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी (लहान कुटूबांचे प्रतिज्ञापत्र) दोनपेक्षा अधिक अपत्य नसलेबाबतचे प्रतिज्ञापत्र हजर होणेपूर्वी सादर करणेत यावे.

१६) इंग्रजी माध्यम २० टक्के आरक्षणानुसार नियुक्त झालेल्या शिक्षण सेवकांने शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडील निर्णय क्रमांक पीआरई/२००६/(४८४३/०६) प्राशि-१ दिनांक २ जून २००८ च्या निर्णयानुसार यथोचित अध्यापनाची कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

१७) सदरच्या नेमणुका हया पूर्णपणे हंगामी स्वरुपाच्या आहेत. कोणतीही आगावू दखल न देता अगर कोणतीही कारणे न दाखविता त्यांना नोकरीतून केंव्हाही कमी करण्यात येईल व त्याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही .

**१८) उमेदवारांने मूळ डी.एड. प्रमाणप्रत्र पडताळणीसाठी या कार्यालयाकडे समक्ष सादर करूनच संबधीत पंचायत समितीकडे हजर होणेचे आहे.**

१९) ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील १६ नोव्हेंबर २००७ नुसार नियुक्ती दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आपणास बंधनकारक राहिल.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सांगली**

**प्रति**
श्री./श्रीमती-----------------------------------------
पत्ता :- -----------------------------------------
-------------------------------------------------

**प्रत- माहितीसाठी व जरुर त्या कार्यवाहीसाठी रवाना**
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, -------------------
गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती, ----------------------

२/- उपरोक्त आदेशात नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार जरुर ती कार्यवाही करुन उमेदवारांना हजर करुन घेवून त्याच दिवशी शाळेवर पाठवावे. आदेशतील अटी व शर्ती मान्य असलेबबातचे **हमीपत्र** उमेदवाराकडून घेणेचे आहे . अप्रशिक्षित उमेदवारांकडून पत्राव्दारा डी.एड. करुन घेणेबाबतची पूर्ण जबाबदारी तालुका स्तरावरील गटशिक्षणाधिकारी यांची राहील. **याबाबतची नोंद उमेदवाराचे मूळ सेवापुस्तकात नियुक्तीच्या आदेशासह घ्यावी. तसेच त्याची जात, जातीचा प्रवर्ग, सामाजिक आरक्षण याबाबत सविस्तर नोंदी सेवा पुस्तकात घेणेच्या आहेत. तसेच अप्रशिक्षीत उमेदवाराबाबतही सविस्तर नोंद घ्यावी.** आदेशातील मागासवर्गीय उमेदवारांकडे असलेल्या वैधता प्रमाणपत्राची आवश्यक ती नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकात घ्यावी. .शिक्षण सेवकाच्या आवश्यक त्या शैक्षणिक व इतर कागदपत्रासह वैयक्तिक नस्ती तयार करुन जतन करणेच्या आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सांगली**